








# BULLETIN





## THE REMINISCENCES OF ALUMNI M.B.A. 1983 BATCH

## AFTER 40 YEARS

**दिनांकः ३१ डिसेंबर २०२३**

**४० वर्षानंतरचे सायबर M.B.A. १९८३ गेट टुगेदर [माजी  विद्यार्थी मेळावा]**

**[दुसरा दिवस-अंबाई नाका, सायबर येथे सोमवार दि. २७ नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी ४ ते ६]**

**लय भारी! सायबर आमचे कोल्हापूरी!!**

1. 'योजकस्तत्र दुर्लभः' स्व. ए.डी. शिंदे सी.ए. यांनी दूरद्रुष्टीने छत्रपती शाहू इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्च (सायबर) मॅनेजमेंट इंस्टिटयुटची स्थापना सन १९७६ साली केली. M.B.A. च्या दोन बॅचेस नंतर सायबरचे शालिनी पॅलेस, रंकाळा, कोल्हापूर येथून तत्परतेने अंबाई नाका येथील प्रशस्त व अद्ययावत इमारतीत स्थलांतर झाले. स्व. ए.डी. शिंदे यांच्या दूरदृष्टी व VISION MISSION नुसार सायबर नावारूपाला येत होते. या शैक्षणिक संकुलात विविध मॅनेजमेंट, वाणिज्य व प्रोफेशनल कोर्सेस सुरू झाले आहेत. या शैक्षणिक संकुलाचे वटवृक्षात रूपांतर झाल्याचे पाहताना आम्हा M.B.A. १९८३ बॅचच्या माजी विद्यार्थांना खूप आनंद झाला.

स्व. डॉ ए.डी. शिंदे साहेब व स्व. व्ही.पी. वाडकर सर यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करून आमच्या M.B.A. १९८३ बॅचच्या या गेट टुगेदरचा वृत्तांत सादर करीत आहोत.

G.T. Get Together of M.B.A. १९८३ बॅच हा स्नेहाचा व परवलीचा शब्द ऑक्टोबर २०२३ पासून या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांच्या व्हॉटस्अप ग्रुपवर फिरू लागला. तत्परतेने सर्व सिनिअर सिटिझन - माजी विद्यार्थ्यांच्या उत्फुर्त सहभागामुळे आजचे गेट टुगेदर यशस्वी होत आहे व या आनंद सोहळयात सर्वांना सहभागी होताना MBAच्या 2 वर्षांच्या सुखद आठवणींना उजाळा मिळाला.

12 वर्षांचे एक तप असते. राम-भरत भेट 14 वर्षांनंतर अयोध्येत झाल्यावर अयोध्यानगरीत आनंदोत्सव साजरा झाला पण आम्ही M.B.A.१९८३ चे सायबरचे माजी विद्यार्थी ४० वर्षानंतर सायबर शैक्षणिक संकुलात सोमवार दि. २७ नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत भेटून तीन तपानंतरचा आनंदोत्सव साजरा केला.

''योजकस्तत्र दुर्लभः'' या ब्रिद वाक्याचा समग्र अर्थ आमच्या M.B.A. १९८१ ते १९८३ या दोन वर्षात आत्मसात करण्यासाठी सर्व M.B.A. प्रोफेसर्स यांनी आम्हास सतत प्रोत्साहन देत प्रशिक्षीत केले होते. या सर्व सायबरच्या प्रोफेसर्स बद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. राव सर, डॉ. आमटे सर, डॉ. श्रेष्ठी सर, डॉ. आर.व्ही. कुलकर्णी सर, डॉ. राजहंस सर, डॉ. एस. पी. रथ सर (संचालक), डॉ. विनायक साळुंखे (प्रशासन अधिकारी) यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत सायबरच्या चौफेर प्रगतीचा आढावा घेत आम्हा सर्व M.B.A. १९८३ बॅचच्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून खुप छान मार्गदर्शन केले, म्हणुन आम्हास परत म्हणावेसे वाटते की "लय भारी! सायबर आमचे कोल्हापूरी!!"

फंडामेंटल, टेक्निकल ॲनालिसीस करत शेअर मार्केटचा तेजी-मंदीचा कल ओळखून वेळीच गुंतवणूक करणे किंवा काढून घेणे याचे शास्त्रशुध्द तंत्र जाणणारे वॉरन बफे शेअर मार्केटचे मॅनेजमेंट गुरू आहेत. त्याच प्रमाणे आमची सायबर संस्था व आम्हांस विविध मॅनेजमेंट विषयांचे प्रशिक्षण कुशलतेने देणारे आमचे एमबीए मॅनेजमेंट गुरू आम्हास अत्यंत प्रिय व आदरणीय आहेत.



Felicitation of retired Principal Dr. P.S. R Rao



Felicitation of retired Prof.Dr. Amte Sir

आमचे अत्यंत समंजस व वर्गात सर्वांना प्रिय असे दोन वर्गमित्र म्हणजे श्री.सूर्यकांत पाटील बुधिहाळकर व श्री.एस.एम.हुदली. त्यांनी गेट टुगेदरच्या दुसऱ्या दिवशीही सायबरच्या कार्यक्रमात उत्स्फुर्त सहभाग देत सर्व प्राध्यापकांची वाहवा मिळवली. तसेच या कार्यक्रमाचे खूप छान सूत्रसंचालन केले. त्याचा परिपाक म्हणजे श्री. एस.एम. हुदली यांची सायबर संस्थेकडून Royal Alumni Day १० डिसेंबर २०२३ या दिवशी Guest on Dias साठी सन्मानाने निवड झाली. हा तर आमच्या एम.बी.ए १९८३ बॅचच्या वेगवेळपणाचा सायबर कडून मिळालेला मोठा मान व सत्कार आहे.

या दोन दिवसांच्या गेट टुगेदरच्या आठवणी कायम स्मरणात राहाव्यात म्हणून सर्व प्राध्यापकवृंदासमवेत खूप ग्रुप फोटो घेतले.

2. शब्दांकन विजय घेवारी - 'MBA Dual Subjects Specilization' चला आठवूया प्रथम व द्वितीय वर्ष एम.बी.ए. च्या सर्व विषयांची नावे व आपणास कुशलतेने घडविणाऱ्या सर्व प्राध्यापकांची नावे. ती खालील प्रमाणे आहेत. या कामी मला माझा वर्गमित्र श्री. विश्वास पाटील याने वेळीच मदत केली. धन्यवाद विश्वास!

**M.B.A. - I**

| Sr. No. | Subject Name | Professor Name |
|---|---|---|
| 1 | Principles of Management | Dr. Prof. Sinha |
| 2 | Managerial Economics | Dr. Prof. Paithankar |
| 3 | Financial & Cost Accounting | Dr. Prof. V.P. Wadkar |
| 4 | Legal Aspects of Business | Adv. Doshi & Adv. Naniwadekar |
| 5 | Mathematics & Statistics for Management | Prof. Rajahauns |
| 6 | Written Analysis and Communication | Dr. S.V. Deshpande &<br>Smt. Chhatre Madam |
| 7 | Research Methodology | Dr. Prof. Kulkarni |
| 8 | Marketing Management | Dr. Prof. Amate |
| 9 | Personnel Management | Dr. Prof. Shaikh |
| 10 | Financial Management | Dr. Prof. V.P. Wadkar |
| 11 | Production Management | Dr. Prof. A.M. Pathvardhan |



Felicitation of Dr S. P. Rath Sir CSIBER




Felicitation of Professor Dr Shreshthi Sir

**M.B.A. - II**

| Sr. No. | Subject Name | Professor Name |
|---|---|---|
| 1 | Business Policy | Dr. Principal Rao |
| 2 | Management Accounting | Dr. Prof. Shreshthi |
| 3 | Small Enterprise Management | Dr. Prof. Kulkarni |
| 4 | Indian Economics Environment | Dr. Prof. Paithankar |

| | | |
|---|---|---|
| 5 | Organisational Behaviour | Dr. Principal Rao & Dr. Jakate |
| 6 | Marketing Management | Dr. Sinha & Dr. Amate |
| 7 | Personnel Management | Dr. Shaikh & Dr. V.V. Khanzode |
| 8 | Financial Management | Dr. Prof. V.P. Wadkar |
| 9 | Production Management | Dr. Prof. A.M. Pathvardhan |
| 10 | Quantitative Techniques | Dr. Prof. R.V. Kulkarni |
| 11 | Project Report (As per Sr. No. 6 to 10) | M.B.A. Dual Subject offered |

### ३. शब्दांकन विजय घेवारी - 'CSIBER Kalpavruksha' - NAAC A+ International Management Institute

आमच्या M.B.A. १९८१ ते १९८३ बॅचमध्ये ८० विद्यार्थी होते. ७० मिनिटाचे दररोजचे चार तास दोन वर्षे अध्ययन करताना कोणत्याही विषयाचा ७० मिनिटाचा तास केव्हा संपला हे कळायचेही नाही इतके समग्र अध्यापन सर्व विषयाचे प्राध्यापक करत होते. त्यामुळे आम्हास "योजकस्तत्र दुर्लभः" या ब्रिद वाक्याचा समग्र अर्थबोध झाला.

सायबरच्या प्रशस्त अद्ययावत ग्रंथालयात व अभ्यासिकेत पिनड्रॉप सायलेन्स मध्ये तासनतास अभ्यास केल्याचे दिवस आठवतात या परिपूर्ण मॅनेजमेंट विषयांचा अभ्यास आमचा आत्मविश्वास वृध्दींगत करणारा होता. M.B.A. Dual Subjects मुळे प्रत्येक विद्यार्थ्याची आवडीच्या विषयातील समरसता वाढवण्याचे कार्य सर्व एम.बी.ए. प्राध्यापकांनी कुशलतेने केले ही आम्हा विद्यार्थ्यांना पर्वणी होती.

या गेट टुगेदरचा दुसरा दिवस व या दोन दिवसांमध्ये साजरा केलेला आनंदोत्सव सर्वांना कायम प्रेरणा देत राहील व स्मरणात राहील असाच आहे.

बी.फार्मसी ४ वर्षे व एमबीए २ वर्षे एकत्र शिकलेला निपाणीतील माझा वर्गमित्र 'श्री. अजित शहा' याने माझ्या आजारपणाची आपुलकीने चौकशी करून एमबीए गेट टुगेदरच्या दुसऱ्या दिवशी दि. २७ नोव्हेंबर २०२३ रोजी सायबर इंन्स्टिटयुटमध्ये येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे अजित व मी एमबीए गेट टुगेदरच्या दुसऱ्या दिवशी सायबरमध्ये आनंद सोहळयात सहभागी झालो.

एमबीए १९८३ बॅचमध्ये ८० पैकी आम्ही तीन वर्गमित्र तांत्रिक शैक्षणिक पार्श्वभूमी असलेले होतो. मी व अजित बी.फार्मसी व पी.सतिश बी.ई. (मेकॅनिकल). भविष्यात टेक्निकल क्वालिफाईड विद्यार्थ्यांना नामांकीत मॅनेजमेंट संस्थेतून एमबीए करणे हे त्यांचा करिअरचा ग्राफ उंचावण्यासाठी आवश्यक ठरणार आहे असे नमूद करत आहे.

CSIBER MBA 1983 Batch GT and Remembrance of Visionary Late A. D. Shinde saheb and Felicitation of our Management Guruji's on Date 27 November 2023 was a memorable event. All senior citizens who have young minds' for them this event was like a BOOSTER dosage after 40 years that was much needed to be underlined. Our CSIBER an **International and Intercontinental NAAC A+ Accredited Management Institute,** offering now multiple Quality Professional Educational Courses with Highly Qualified and Experienced staff and Ultra-Modern Infrastructure facilities is our Pride. Our Mother Management Institute is a **'Kalpavruksha'** to us and to next generation Students of CSIBER.

V. G. Ghewari Proud Alumni MBA 1983 [Production & Marketing Management].

Thanks to **Dr. T V G Sarma Sir Present Economics Professor** of CSIBER for sharing the news of Get-together of our MBA 1983 batch to me and for constant motivation and support for our MBA Batch GT at CSIBER. This news is published on Page No. 2 Date 7 December 2023 in Daily Lokmat, Kolhapur edition. Sarma sir provided me contact No. of Dr. Vinayak Salokhe Sir for proper co-ordination of Get-together of our batch at CSIBER.



Felicitation of retired Professor Dr Rajahansa Sir

**सायबर गेट टुगेदर पहिला दिवस – गगनबावडा स्टोनार्क रेसॉर्ट**

**4.** शब्दांकन बसवराज आवटे - साऊथ इंडिया सहल दि. २५ ऑक्टोबर २०२३ ते ३ नोव्हेंबर २०२३ पर्यंत आम्ही 3 वर्गमित्रांनी (श्री. श्रीकांत प्रभुदेसाई, श्री. बसवराज आवटे व श्री. अरूण गाट) उत्स्फुर्तपणे सहकुटूंब साऊथ इंडिया सहल आयोजित करून एम.बी.ए. १९८३ बॅचच्या वॉटस्अ‍ॅप ग्रुप वर फोटो पोस्ट करून गेट टुगेदरची उत्कंठा वाढवली. चौथे मित्र अरूण वाली यांनी सहकुटूंब ४० वर्षानंतरची होणारी भेट हुबळी रेल्वे स्टेशनवर पाठलाग करून मोठया आतुरतेने घेतली. त्यामुळे अल्पावधीत ३२ वर्गमित्र-मैत्रिणी गेट टुगेदरसाठी मोठया उत्कंठतेने व आनंदाने आपोआप तयार झाले.

5. उत्साही व्यक्तिमत्व श्री राजन जगदाळे MBA वर्गमित्र याने सर्व MBA प्राध्यापकांना भेटून गेट टुगेदरसाठी येण्याचे आमंत्रण देवून मोलाचे कार्य वेळीच केले व सर्व कार्यक्रमात उत्स्फुर्त सहभाग दिला. त्यामुळे GT 1 व GT 2 या 2 दिवसाचे खुप चांगले नियोजन झाले. राजनचा मनमिळावू स्वभाव सर्वांना आवडला आहे व त्याचे MBA १९८३ ग्रुप मार्फत कौतुक करणे उचित आहे.




Inspirational speech by Dr. V. S. Salokhe Administrative Officer CSIBER. NAAC A+, National International and Intercontinental Management Institute.

**स्वच्छंदी फुलपाखरा प्रमाणे सतत आनंदी राहणाऱ्या व आनंद पसरवणाऱ्या चॉकलेट हिरो देवआनंद प्रमाणे व्यक्तिमत्व असलेल्या उत्साही वर्गमित्राचे नाव काय बरे? अरे हा तर आपला राजन जगदाळे आहे बरं!!**

**6. शब्दांकन विजय घेवारी - "लय भारी ! सायबर आमचे कोल्हापूरी !!"**


दोन दिवसांच्या एमबीए १९८३ बॅचचे ४० वर्षानंतरचे गेट टुगेदरचे नियोजन ऑक्टोबर 2023 पासून होत असल्याचे वॉटस्अ‍ॅप ग्रुपवरून सतत अपडेटस् मिळत होते. मनाला सुखद आनंद व गुदगुल्या होत होत्या. या ग्रुपवर सहभागी करून घेणारा माझा मित्र श्री. बसवराज आवटे याचे मनापासून धन्यवाद! माझ्या आजारपणामुळे व वैयक्तिक अडचणींमुळे GT1 - गगनबावडा स्टोनार्क रेसॉर्ट येथे इच्छा असूनही

सहभाग देता आला नाही याची मनाला कायमची खंत राहील. मोठया मनाने श्री.  श्रीकांत प्रभुदेसाई यांनी "तू फक्त दुसऱ्या दिवशी सायबरला ये" असे सांगत मला समजून घेतले.

पडद्यामागे राहून अप्रत्यक्षपणे या गेट टुगेदरसाठी मला सहभाग देता आला. प्रभुदेसाई, सूर्यकांत, सुनिल व राजन यांचेशी मोबाईलवर बोलणे सुरू झाले. वॉटस्ॲप संपर्क सुरू झाला. एमबीए वर्गमित्र परेश प्रतापचा संपर्क उशिरा झाला. सुहृदय व गुजरात येथील यशस्वी टेक्सटाईल इंडस्ट्री कंन्सलटंट परेश प्रताप गेट टुगेदरसाठी आल्याने खूप आनंद झाला. मी सायबरमधील इकॉनॉमिक्सचे प्राध्यापक डॉ. टी.व्ही.जी. शर्मा सर, सायबर प्रशासन अधिकारी डॉ. विनायक साळोखे, संचालक डॉ. एस. पी. रथ सर, प्रोफेसर डॉ. आर.व्ही. कुलकर्णी सर व प्रोफेसर डॉ. श्रेष्ठी सर यांच्या संपर्कात होतो. एमबीए १९८३ च्या बॅचचे  गेट   टुगेदरचे नियोजन सायबर येथे दि. २७ नोव्हेंबर २०२३ रोजी आयोजित केले आहे व आपण येवून आपले मार्गदर्शन व शुभ आशिष द्यावेत, लवकरच एमबीए बॅच १९८३ च्या वतीने आपणास भेटून निमंत्रण देण्यास येत आहोत असे मोबाईल वरून प्रोफेसर डॉ. आर.व्ही. कुलकर्णी सर व प्रोफेसर डॉ. श्रेष्ठी सर यांना सांगितले.  राजन व सुनिल यांना प्रोफेसर डॉ. आर.व्ही. कुलकर्णी सर व प्रोफेसर डॉ. श्रेष्ठी सर यांचा मोबाईल नंबर देताना मला खूप आनंद झाला.

दुध का दुध व पाणी का पाणी करणे वाला कौनसा पंछी होता है या माझ्या प्रश्नाचे चाणाक्ष सुनिलने मला 'राजहंस'  असे बरोबर उत्तर दिले. त्यामुळे Mathematic and Statistics for Management या विषयाचे प्राध्यापक डॉ. राजहंस सर यांचेशीही संपर्क झाला. जास्तीत जास्त मॅनेजमेंट गुरूवर्यांचा सहभाग मिळवताना शेवटपर्यंत प्रोफेसर डॉ. ए.एम.पटवर्धन सर यांचा संपर्क क्रमांक मिळाला नाही. तसेच प्रकर्शाने आठवणारे प्रोफेसर डॉ. जकाते सर, प्रोफेसर डॉ. सिन्हा सर, प्रोफेसर डॉ. शेख सर, प्रोफेसर डॉ. पैठणकर सर, डॉ. एस. व्ही. देशपांडे सर, श्रीमती छत्रे मॅडम यांच्याशीही संपर्क होऊ शकला नाही. या  ४० वर्षानंतरच्या यशस्वी अशा एमबीए १९८३ बॅचच्या गेट टुगेदरचे संकलन करण्याची प्रेरणा मला सायबर GT 2 दि. २७ नोव्हेंबर २०२३ रोजी डॉ. एस. पी. रथ संचालक व डॉ. विनायक साळोखे प्रशासन अधिकारी यांच्या मार्गदर्शनामुळे मिळाली! ''लय भारी! सायबर आमचे कोल्हापूरी!!"

विजय घेवारी. Proud Alumni MBA 1983 Production and Marketing Management



**7. शब्दांकन श्रीकांत प्रभुदेसाई - ‘ मित्रांबरोबर केलेली ट्रीप ही आपल्याला अधिक उर्जा व आनंद देते ’**

हॅलो मित्रांनो......... चाळीस वर्षापूर्वी मी, श्री. अरूण गाट आणि श्री. बसवराज आवटे एमबीएच्या निमित्ताने एकत्रित आलो, ते आजही एकत्र आहोत. मी इचलकरंजीचा, अरूण हुपरीचा आणि बसवराज आता कोल्हापूरचा. पण आमची मैत्री आजही अबाधित आहे, ती अगदी कौटुंबिक झाली आहे. आम्ही नेहमी वरचेवर एकत्रित सहली करतो. नुकतेच आम्ही दक्षिण भारतात फिरून आलो. प्रथम तिरूपती बालाजीचे दर्शन घेतले. नंतर तेथून तामिळनाडूमधील यरकॉड व येलागिरी ही हिल स्टेशन्स आणि तिरूवनमलाई या ठिकाणी फिरून आलो. खूप छान झाली आमची ट्रिप!

माझा तुम्हा सर्वांनाही एक अनुभवाचा सल्ला आहे. आपल्या कुटूंबीयांसोबत आपण फिरत असतो, पण मित्रांबरोबर केलेली ट्रिप ही आपल्याला अधिक ऊर्जा व आनंद देते तसेच आपले जीवन अधिक आनंदी व समृध्द बनवते!

**8. शब्दांकन राजन जगदाळे - स्वप्नवत गेटटुगेदर आनंदोत्सव -** रविवार दि. २६ नोव्हेंबर २०२३ रोजी आमच्या सायबर M.B.A. १९८३ चे बॅचचा ४० वर्षा नंतरचा गेट टुगेदरचा पहिला दिवस होता. आमच्या बॅचच्या श्रीकांत प्रभुदेसाई, सुनिल कुरतडकर, सुर्यकांत पाटील बुधिहाळकर, बसवराज आवटे, राजन जगदाळे, एस.एम. हुदली यांनी नियोजनबध्द परिश्रम करत दोन दिवसांच्या गेट टुगेदरचे खुप चांगले नियोजन केले. Q. K. मुल्ला, राजा माने, परेश प्रताप, नंदकुमार मेहतर, अरूण गाट, अरूणकुमार वाली, मंगला भोसले देसाई, सुचेता, अंजली मांडके, अंजु बैंदुर खांडेकर इत्यादी वर्गमित्र व मैत्रिणी यांनी उत्स्फुर्त सहभाग देत रंगत वाढवली. पहिल्या दिवसाच्या गेट टुगेदरचे शब्दांकन खालील प्रमाणे आहे.

रविवार दि. २६ नोव्हेंबर २०२३ रोजी गोकुळ हॉटेल, कोल्हापूर येथे सकाळी ८.०० वा. नाष्टा घेत असताना आम्ही सर्व M.B.A. १९८३ बॅचचे तीस विद्यार्थी प्रथमच ४० वर्षानंतर भेटतानाच्या आनंदाचे वर्णन शब्दात करणे शक्य नाही. गोकुळ हॉटेल येथून गगनबावडा स्टोनार्क रेसॉर्ट येथे पुर्ण वेळ एक दिवसाच्या मुक्कामासाठी सकाळी ११ वा. पोहोचलो. दुपारच्या जेवणानंतर विश्रांती घेवून सायंकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत गप्पा-गोष्टी, विनोद, नाच व गायन, विविध गुणदर्शन इत्यादी मध्ये आम्ही सर्व M.B.A. १९८३ चे व वर्गमित्र मैत्रिणी मनमुराद आनंद लुटत असताना वेळ कमी पडत होता. हे सारे स्वप्नवत वाटत होते.

सूर्यकांत पाटील बुधिहाळकर यांनी सुगम गायनाने सर्वांची मने जिंकली व प्रथमच या मित्राच्या सुप्त



Group Photo of Alumni at CSIBER Institute

**कलागुणांची** ओळख ४० वर्षानंतर झाली. सूर्यकांत यांचे फेसबुक रेकॉर्डेड गाणी ‘जिंदगी के सफर में गुजर जाते हैं जो मकाम, वोह फिर नही आते’ व ‘जाने कहां गये वो दिन, कहते थे तेरी राह में’ अतिशय श्रवणीय झाली. कान तृप्त झाले सुर्यकांत!

दि. २७ नोव्हेंबर २०२३ रोजी ‘गगनगिरी’ सर करतानाचा सर्व मित्र मैत्रिणींचा सळसळता उत्साह अत्युच्च आनंद लहरी निर्माण करणारा होता. दुपारच्या जेवणानंतर आम्हास प्रवासात फक्त सायबर इन्स्टिटयुट व प्राध्यापकांना लवकरच भेटण्याचा क्षण दिसत होता....... आलो सर्वजण आतूरतेने सायबर मध्ये बरोबर ४ वाजता!!!

**9. शब्दांकन श्रीकांत प्रभुदेसाई - ‘Seek blessings of Professor’s was summit of our reunion’**

Reunion with friends is always an energising event! And when friends are meeting after a long gap of forty years, naturally, it's going to be a big explosion of joy!! Exactly so were our last 2 days. Thank you very much friends for making it happen. You put aside all your family problems, business engagements and even your personal physical ailments and rushed for this get-together.

Those who couldn't (or didn't) come surely missed a great and rare event of their life.

I specially thank girls of my batch. We were afraid that this 40 years' gap might become a hindrance for you to prepare your minds to come. But you proved us wrong and participated with full vigor.

We all must thank Sunil for putting so much effort into making this get-to happen. Rajan and Suryakant’s support also must be specially mentioned and appreciated.

The concluding part of the get-together was really touching.

To meet our veteran and respectable professors and **seek their blessings was the summit of our reunion**.

Those who missed this reunion **make sure that the next get-together is not missed.**

Again lots of thanks to all of you.

## 10. शब्दांकन विजय घेवारी – ‘Care taker PRABHU’

Great motivator and transparent MBA Classmate...name Prabhudesai Shrikant... Prabhu as name suggests is really **a caretaker of all with love and affection**... Perfect MBA theory and practical demonstration by PRABHU... Hats off, salute to you...


Relax mood and never ending Happiness.

**11. शब्दांकन मंगला भोसले देसाई- ' तिळा तिळा दार उघड....'**

तिळा तिळा दार उघड.... असं आम्ही गेले तीन महिने म्हणत होतो. कालौघात विस्मृतीत गेलेली गुहा.....! त्या अनोख्या गुहेचा तो जडषीळ 'दरवाजा'.....! वर्षानुवर्षे ऊन पावसाने पडझड झालेला..! अर्थहिनता' नावाची 'नाईलाजी' कसर लागलेला..... 'निरसता' नावाच्या घट्ट, रूतलेल्या बिजागऱ्यांनी जखडला गेलेला..... 'सरलेपण' नावाच्या गंजक्या, किल्ली हरवलेल्या कुलुपाने बेबुनियाद बंद झालेला तो दरवाजा....!! उघडता उघडत नव्हता. कुठुन दुरून दुरून म्हणजे की..... पुणे, मुंबई, नागपूर, बडोदा, कोल्हापूर, सोलापूर, विटा, सातारा, बेळगाव झालंच तर परदेशातूनही सगळीकडून लोकांनी इच्छा व्यक्त केली..... आखिरकार..... एकदासं उघडलं की दार. नव्हे उघडला दरवाजा त्या खोल गुहेचा...! आणि सापडला की खजिना!! अपूर्व स्नेहाचा! बे-इंतिहा आपुलकीचा! निखळ मैत्रिचा!! मिळाले.... सापडले... नव्हे आले की एकत्र सारे जण...!! चार तपांपूर्वी या घनघोर जनवनात गुप्त झालेले, विखुरलेले, अज्ञातवासात गेलेले व त्याकाळी अभ्यासाने मेटाकुटीस आलेले बिच्चारे जीव...म्हणजे तेच ते... ती पोरं आणि त्या हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या पोरी! हो हो ....! पोरं आणि पोरीच ती! कळालं कोण ते?..... थोडं सावरून सावचित्त होवून बसा...आणि आणि.... सावधान ''सीनियर सिटीझन्स'' वगैरे असा जडतलब, कुटकुटा, खटखटा, डोक्यावर उगाचच वयाचं ओझं दर्शविणारा... बेकार, बेहिशेबी कावा साधून आमच्या अव्याहत चैतन्याबाबत उगाचच बेमतलब शंका उपस्थित करणारा.... आमच्या अविरत उत्साहाशी बेईमानी करून आमच्या बिचाऱ्या वाढलेल्या वयाचा हिसाब किताब खोलणारा तो "आकडेबहाद्दर" शब्द वापरण्यास इथे सक्त मनाई आहे!

तर कोल्हापूर येथे १९८१ -१९८३ या काळात सायबर कॉलेजमध्ये शिकलेली आम्ही पोरं आणि पोरी एकत्र आलो. सायबर मध्ये एमबीए केलेले आम्ही सारे जण २६ व २७ नोव्हेंबर २०२३ रोजी गगनबावडा येथे एकत्र जमलो. गगनबावडयाला जाण्याकरिता म्हणून जसजसे सारे जमायला लागले.... तसे ४० वर्षानंतर एकमेकांना पाहताना सर्वांच्या चेहऱ्यावर 'आहो आश्चर्यम! आणि परम आनंदम्!' असे भाव होते.

गगनबावडा मध्ये 'स्टोन आर्क'मध्ये एकत्र आल्यावर सर्वाना गुलाब पुष्प देवून स्वागत केले गेले. सर्वानी पुन्हा नव्याने स्वतःची ओळख करून दिली. सारे जण आपापल्या क्षेत्रात माहीर! आपापल्या परीने यशस्वी! काहींनी यशाचे आव्हानात्मक शिखर गाठले तर.... काहींनी काळया आईचे आवाहन ऐकून तिच्याशी ईमान ठेवून तिची सेवा केली.... अजूनी करताहेत. सारे महानच!

त्याकाळी अभ्यासाचे, अकरा अकरा विषयांचे डोक्यावर इतके ओझे होते की, एकमेकांकडे वळून पाहणे वगैरे सोडा..... पण मान वर करणे देखील अशक्य होते. त्यात आम्हा पोरींचे हाल तर विचारू नका... नुसता अभ्यास आणि अभ्यासच! आमच्यासारखे बी.एस.सी. होवून एमबीए ला आलेले.... त्यांची तर गत.... अरेरे...! ना घर का ना घाट का... ना मट्टीका ना आसमाँ का! ''अकौटन्सी कशाशी खात रे

भाऊ?'' या प्रश्नाचे उत्तर शोधता शोधता वर्ष सरलं. असो! नियतीने आखून दिल्याप्रमाणे दोन वर्षाचा तो सहवास!

सधारणपणे वीस ते बावीस या वयात वर्षांसाठी एकत्र असलेलेले आम्ही.... पुनश्च सारे एवढया कालांतराने एकत्र आलो. "आपली माणसं"... ऐवढेच बिरूद या एकत्र येण्याला होतं. कुठल्याही प्रकारची औपचारिकता नाही. 'सहज' सरल गप्पा! आम्हा पोरींना तर माहेरच मिळालं!

काहींनी आपल्या माणसांचं, आई वडीलांचं छत्र गमावलेलं.... ते शल्य उरी घेवून एकत्र आलेलो आम्ही! वाटलं की.... त्या जगत-नियंत्यानेच आमच्या मनावर हळुवार पुन्हा फुंकर घालण्यासाठी आम्हाला ही मायेची शाल बहाल केली! व्यावहारिक जीवन जगताना, कर्तव्य निभावताना, एम.बी.ए. मध्ये प्रा. जकाते सरांनी शिकवलेली एक संकल्पना म्हणजे Self evaluation---!! तर यात स्वतःला जोखताना.... स्वतःला विसरूनच गेलो होतो आम्ही! आपल्या माणसात आल्यावर जाणीव झाली स्वत्वाची! कुटुंबात हरपलेल्या इवल्याशा स्वतःच्या अस्तित्वाची! केवढया त्या गप्पा आणि आठवणींना दिलेला उजाळा! किती हसलो आम्ही सगळे! ते खळाळतं निखळ हास्य होतं. या व्यावहारिक जीवनात हसणं विकत नाही. हो ते मिळतं!!!

गगनबावडयात आम्हाला आनंदाचं 'गगन' मिळालं. आम्हा पोरींना जणू माहेरचं 'आभाळ' मिळालं. दुसऱ्या दिवशी म्हणजे २७ नोव्हेंबर २०२३ ला आम्ही सायबर मध्ये आमच्या गुरूवर्यांना भेटलो व त्यांचे मौल्यवान आशीर्वाद घेतले. शाल, श्रीफळ हे प्रेमाचं द्योतक...! ते पाहून गुरूजनांना भरून आलं. ज्या काहींनी साऱ्यांना एकत्र आणले व ज्या काही साऱ्यांनी या परिश्रम करणाऱ्यांना उर्जेचे बळ दिले.... त्या सर्व बंधू भगिनींना धन्यवाद!

राजन, सूर्यकांत, श्रीकांत, सुनिल व सुचेता आपणांस धन्यवाद!

मंगला भोसले देसाई.

**12. शब्दांकन अंजु खांडेकर - 'निखळ आनंद आणि ऊर्जा घेऊन परतलो'**

कालपासून गेट टुगेदर बद्दल लिहिण्याचे ठरवते आहे पण शब्दच सापडत नव्हते. कारण तो आनंद अवर्णनीयच आहे. ४० वर्षानंतर सर्वजण भेटणार म्हणून मनात थोडी धाकधुक होती ती सर्वांना भेटताक्षणी नाहीशी झाली. इतकी सहजता, आपुलकी, जिव्हाळा सर्व काही अनुभवलं की खूप वर्षांनी भेटतोय असं वाटलंच नाही. सुचेता म्हणते त्याप्रमाणे काही वर्ष वाया गेली याची हळहळ वाटली आणि मंगल म्हणते तसा निखळ आनंद आणि ऊर्जा घेऊन परतलो. हा गेट टुगेदर चा सिलसिला असाच चालत राहू दे. हा सर्व आनंद-मेळावा जमवुन आणण्यासाठी आणि गुरूजनांचा आशिर्वाद घेण्यासाठी सुनिल, राजन, श्रीकांत, सूर्यकांत आणि इतर जणांनी जे प्रयत्न आणि कष्ट घेतले त्याबद्दल या सर्वांचे खूप खूप आभार व कौतुक!




**13. शब्दांकन राजा माने - ‘नंदूच्या फ्लॅटवरील मिनी गेट टुगेदर व तानाजीचे गुऱ्हाळ विस्ताराने लिहीन!’**

प्रिय सुनिल, सप्रेम नमस्कार, तू पुढाकारच नव्हे तर पालकत्व घेऊन एक यादगार स्नेह सोहळा पार पाडलास! काटकसर आणि उत्तम सुविधा यांचा उत्तम मेळ तू घातला. राजन, सुर्यकांत, प्रभू आणि अरूणने तुला दिलेली साथ भक्कम होती. शेवटी कुठल्याही उपक्रमात थोडे उन्नीस-बीस होतेच! त्याचा तुला थोडा त्रासही झाला असेल. पण आपला एकमेकांवर तेवढा अधिकार आहेच ना! तू पाप-पुण्य मानत नसशील, तरीही ४० वर्षांपूर्वीची विखुरलेली नाती नव्याने टवटवीत करून सर्वांच्या प्रेम, हक्क आणि विश्वासाच्या गाठी पुन्हा घट्ट बांधण्याचे पुण्य तुझ्या तसेच राजन, सूर्यकांत, प्रभू आणि अरूणच्या पदरात पडले! नंदूच्या फ्लॅटवर आदल्या रात्री झालेल्या मिनी गेट टुगेदर पासून तानाजीच्या गुळापर्यंत खूप खूप लिहिण्या सारखं आहे.... पण ते पुन्हा कधी तरी विस्ताराने लिहीन! सर्वांना एकच सांगणं आहे. आपण एकटे नाही आहोत! सुख-दुःखात तुमच्या जीवाला जीव देणारा आपला हा शक्तीशाली परिवार तुमच्या सोबत आहे. उर्वरीत आयुष्यात एकमेकांच्या चुका पोटात घेवू, आनंद आणि समाधानाची आपली संपत्ती वाढवत राहू! आपल्या मुला-बाळांना आणि कुटूंबाला अभिमान वाटेल असे काम करत राहू. भेटत राहू... आपला दोस्त, - राजा माने

**14. शब्दांकन बसवराज आवटे - ‘दोन मंतरलेले दिवस....व उत्साहाची शिदोरी’**

चाळीस वर्षानंतर सर्वांच्या मित्रत्वाची ग्रह स्थिती जुळून यावी व सर्व मित्रांना एक आनंदाची पर्वणी लाभावी, तद्वतच मोहरून टाकणारे व भावविश्व व्यापणारे असे ते दोन मंतरलेले दिवस.... शरीरयष्टी व चेहऱ्याची ठेवण जरी बदलली, तरी मित्रत्वाचा ओलावा मात्र सुगंध दरवळावा तसा दोन दिवस वातावरणात व्यापून राहिला होता. अर्थात सर्वांनी घेतलेले कष्ट व परिश्रम हे कौतुकास्पद आहेतच.

आता मिळालेली उत्साहाची शिदोरी पुढच्या गेट टुगेदर पर्यंत, आनंदाने पुरवून पुरवून वापरता येईल. अशा या सुखाच्या पर्वणी ठरलेल्या, आपल्या या गेट टुगेदरच्या रम्य आठवणी स्वप्नवत जागवत राहू.

**15. शब्दांकन सूर्यकांत पाटील बुधिहाळकर ‘Shrikant who generated this idea of great** nostalgic gettogether’ ‘Guys keep in touch’

Dear all friends,

It really has been a great **nostalgic get together** event since yesterday morning.

It is really appreciable of all present, that they managed to find time for this as all are busy and I do believe that only those who are busy in any form of work and engagements, can plan and find time. We all have had a long passage of time in life with a variety of experiences, some few worthy of those that we have shared.

Meeting a few of our teachers was a real opportunity to express gratitude we all felt by heart.

Now Ladies (batchmates) have taken responsibility to organize and host the next get together. Thanks. But my only suggestion, do not put a very long span of time in between, as long breaks will only derail our present connection and intentions.

Special mention and thanks to Sunil and Rajan who took great pains in planning and execution, not to forget **Shrikant who generated this idea of great nostalgic gettogether**, and supported his efforts. **Guys keep in touch**, and we all are there to support each other in every way possible.

God bless us all!






**16. शब्दांकन विजय घेवारी - ‘यशस्वी टीम वर्क व आठवणीतल्या साठवणींचे संकलन**

या ४० वर्षानंतरच्या M.B.A.१९८३ गेट टुगेदरचे वर्णन व निवडक फोटो यांचे संकलन करताना अनावधाने काही मित्रांची नावे किंवा माहिती अपूर्ण राहिली असल्यास शेवटी कुठल्याही उपक्रमात थोडे उन्नीस-बीस होतेच! ही बाब माझे एमबीए १९८३ चे सर्व वर्गमित्र व मैत्रिणी समजुन घेतील. आपल्या एमबीए १९८३ बॅचचे श्रीकांत प्रभुदेसाई, राजन जगदाळे, मंगला भोसले देसाई यांनी सदर गेट टुगेदरची

माहिती संकलीत करण्यासाठी व प्रुफरिडींगसाठी वेळीच मदत केली, तसेच या गेट टुगेदरचे ग्रुप फोटो निवडण्यासाठीही साठीही मदत केली. या सर्वांचे मनःपुर्वक धन्यवाद!

द्वापार युगातील परमेश्वर योगेश्वर देवकीनंदन श्रीकृष्ण चर्कवर्ती यांच्या कृपेने 'संजय' यांना दिव्यदृष्टी प्राप्त झाली. त्यामुळे कुरूक्षेत्रावरील धर्मयुध्दाचे यतार्थ वर्णन अंध राजा धृतराष्ट्र यांना 'संजय' यांनी सांगितले. त्यामुळेच जगत कल्याणाची १८ अध्यायांची भगवत गीता आजही आपणास कलियुगात अमुल्य अशी 'जीवन संजिवनी' रूपात मिळाली आहे. आपल्या गेटटुगेदरचे यशस्वी टीम वर्क व 'आठवणीतल्या साठवणींचे संकलन' करण्याचे भाग्य मला महाभारतातील 'संजय' प्रमाणे लाभले.









सर्व एमबीए गुरूजन व एमबीए मित्र मैत्रिणींना २५ डिसेंबर नाताळच्या शुभेच्छा, २६ डिसेंबर श्री दत्तात्रेय जयंती, २८ डिसेंबर गुरूपुष्यामृत, ३० डिसेंबर संकष्ट चतुर्थी व ३१ डिसेंबर परिवार एकता दिनाच्या हार्दिक शुभेच्छा! नुतन वर्ष २०२४ सर्वांना सुख समृध्दीचे, भरभराटीचे व चांगल्या आरोग्याचे जावो ही परमेश्वर चरणी प्रार्थना.

वरील प्रमाणे आमच्या एम.बी.ए. १९८३ बॅचच्या दोन दिवसाच्या ४० वर्षानंतरच्या गेट टुगेदरची साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरा सफळ संपुर्ण.

**कोल्हापूर दिनांक 30-12-2024**

साठवणीतल्या आठवणी - आमच्या एम.बी.ए. १९८३ बॅचच्या गेट टुगेदरची निवडक क्षणचित्रे/ ग्रुप फोटो या संकलनासोबत जोडले आहेत.

सारांश - आपल्या ४० वर्षानंतरच्या स्नेहमय स्वप्नवत २ दिवसांच्या गेटटुगेदरचा सारांश व रसग्रहण परत करूया.

1. 'योजकस्तत्र दुर्लभः'
2. शब्दांकन श्री. विजय घेवारी - 'MBA Dual Subjects Specilization'
3. शब्दांकन श्री. विजय घेवारी - 'CSIBER Kalpavruksha' NAAC A+ Management Institute
4. शब्दांकन श्री. बसवराज आवटे - साऊथ इंडिया सहल
5. उत्साही व्यक्तिमत्व श्री राजन जगदाळे
6. शब्दांकन श्री. विजय घेवारी - ''लय भारी! सायबर आमचे कोल्हापूरी!!
7. शब्दांकन श्री. श्रीकांत प्रभुदेसाई - 'मित्रांबरोबर केलेली ट्रीप ही आपल्याला अधिक उर्जा देते
8. शब्दांकन श्री. राजन जगदाळे - स्वप्नवत गेटटुगेदर आनंदोत्सव
9. शब्दांकन श्री. श्रीकांत प्रभुदेसाई - 'Seek blessings of Professor's was summit of our reunion'
10. शब्दांकन श्री. विजय घेवारी - 'Care taker PRABHU'
11. शब्दांकन सौ. मंगला भोसले देसाई- ' तीळा तीळा दार उघड.... '
12. शब्दांकन सौ. अंजु खांडेकर - 'निखळ आनंद आणि ऊर्जा घेऊन परतलो'
13. शब्दांकन श्री. राजा माने - 'नंदूच्या फ्लॅटवरील मिनी गेट टुगेदर व तानाजीचे गुऱ्हाळ पुन्हा कधी तरी विस्ताराने लिहीन!'
14. शब्दांकन श्री. बसवराज आवटे - 'दोन मंतरलेले दिवस....व उत्साहाची शिदोरी'
15. शब्दांकन श्री. सूर्यकांत पाटील बुधिहाळकर - 'Shrikant who generated this idea of great nostalgic gettogether' 'Guys keep in touch'
16. शब्दांकन श्री. विजय घेवारी - 'यशस्वी टीम वर्क व आठवणीतल्या साठवणींचे संकलन

पुढील गेटटुगेदर वेळी परत एकदा सर्वजण भेटून सूमधूर रसग्रहन करूया. मधल्या काळात आपोआप वेगवेगळया ठिकाणी मिनी गेटटूगेदर होतच राहणार आहेत. आपल्या ग्रुपवर या मिनी गेटटूगेदरचे अपडेट्स जरूर पोस्ट करावेत.



**CHHATRAPATI SHAHU INSTITUTE OF BUSINESS EDUCATION AND RESEARCH (CSIBER), KOLHAPUR - 416004, Maharashtra, India**

**(An Autonomous Institute) Under UGC, Government of India**
**Reaccredited by NAAC with 'A+' Grade**
**Ph: 0231- 2535706, 2535707**
**www.siberindia.edu.in**